महाराष्ट्र शासन MSBSVET, MSSDS, YCMOU, ITS, Skill India मान्यता प्राप्त
पाटील इलेक्ट्रॉनिक्स् इन्स्टिट्यूट
Email : patilinstitutesatara@gmail.com
महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळ, मुंबई बोर्डाच्या कोर्सेस्ना प्रवेश
सर्टिफिकेट कोर्सेस्ना प्रवेश : पात्रता - १० वी, १२ वी पास/नापास व कॉलेजचे विद्यार्थी
■ इलेक्ट्रिकल सुपरवायझर ■ इलेक्ट्रिकल वायरमन ■ टू-व्हीलर मेकॅनिक ■ A.C. मेकॅनिक ■ कॉम्प्युटर ऑपरेटर
■ ऑटोमोबाईल टेक्निशियन ■ मोटार वायडिंग ■ फोर व्हीलर मेकॅनिक ■ वेल्डर / प्लंबर ■ कॉम्प्युटर हार्डवेअर
एस. टी. पास, लायसेन्स व प्लेसमेंटची सोय
प्लॉट नं. ११, राधिका रोड, एस.टी. स्टॅण्डजवळ, सातारा.
प्रवेशासाठी संपर्क : ९८२२०९७०७१

सायं दैनिक सोलापूर
# कटूसत्य
असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक
किंमत ५ रुपये
Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com

नका कॅन्सरला आमंत्रण देऊ...
दारू... अंमली पदार्थ...
गॅरंटेड सुटण्यासाठी...
व्यसन + टेन्शन + भिती + चिंता + नैराश्य + हस्तकंप + निद्रानाश..
(महाराष्ट्राचे पसंतदिदा नशामुक्ती सेंटर)
डॉ. पालवे नशामुक्ती केंद्र
फोन: 9552619752
कॉल / व्हॉटसअॅप करा...
दारू... अंमली पदार्थ...
राम राम करा...
501% रिझल्ट

सोलापूर | RNI No. MAHMAR 2006/17624 | वर्ष २० वे, अंक ४१ वा | शनिवार दि. ३० ऑगस्ट २०२५ | पाने ४ | पोस्ट परवाना:- SLP/04/2023-2025 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR

# “पाणी, जेवण मिळू दिलं नाही, फडणवीस सरकार इंग्रजांपेक्षाही बेकार”

## जरांगेंचा सरकारला दणका मुंबई हादरली भगवं वादळं अपेक्षेपेक्षा जास्त

### जरांगे पाटील यांचं आंदोलन सुरुच राहणार, मिळाली एक दिवसाची मुदतवाढ

मुंबई (कटूसत्य वृत्त):- मनोज जरांगे यांना पाठिंबा देण्यासाठी राज्यभरातून मराठा आंदोलक लाखोंच्या संख्येनं मुंबईत दाखल झाले आहेत. हातात भगवे झेंडे घेऊन जिकडं बघावं तिकडं मुंबईत सगळीकडं मराठा आंदोलक दिसत आहेत.त्यामुळं मुंबईत जणू एक भगवं वादळं आल्याचा भास निर्माण होत आहे.

छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनसच्या परिसरात मोठ्या प्रमाणावर मराठा आंदोलकांचा जनसागर उसळला आहे. या ठिकाणी आंदोलकांनी जोरदार घोषणाबाजी देखील सुरु केली आहे. एक मराठा, लाख मराठाच्या घोषणेनं हा परिसर दुमदुमून गेला आहे. मुंबईत पाऊस सुरु आहे, तरीही देखील या आंदोलकांमधील उत्साह कमी झालेला दिसत नाही. तसंच बृहन्मुंबई महानगर पालिका आणि मंत्रालयाच्या परिसरात मोठ्या प्रमाणावर आंदोलकांची गर्दी पाहायला मिळत आहे. त्याचबरोबर ईस्टर्न फ्री वे वर देखील मराठा आंदोलकांच्या गाड्यांची लांबच लांब रांग लागली आहे.

त्यामुळं हा रस्ता वाहतुकीसाठी बंद करण्यात आला असून त्यामुळं इतर मार्गांवर मोठ्या प्रमाणावर वाहतूक कोंडी झाल्याचं सांगितलं जात आहे. मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मुंबईच्या आझाद मैदानात मनोज जरांगे पाटील आंदोलनासाठी बसले आहेत. त्यांच्यासह हजारो



कार्यकर्ते मुंबईत आले आहेत. सकाळी लाखोंच्या संख्येने मराठा आंदोलक मुंबईत आले. मात्र आझाद मैदान आणि आसपासच्या परिसरात आंदोलकांची मोठी गैरसोय झाल्याची तक्रार आंदोलक करत आहेत. अनेक शौचालये, हॉटेल्स बंद ठेवल्याची तक्रार केल्यानंतर मनोज जरांगे पाटील यांनी संताप व्यक्त केला. तसेच सरकारला इशारा दिला.

पोलिसांनी मनोज जरांगे यांना मुंबईत आंदोलन करण्यासाठी केवळ एका दिवसाची परवानगी दिली होती. मात्र ही मुदत वाढविणार असल्याचे संकेत राज्य सरकारकडून देण्यात आले आहेत. याबाबत बोलताना मनोज जरांगे पाटील म्हणाले, आंदोलनाला मुदत वाढ दिली की नाही, याबाबत मला कल्पना नाही. पण सरकारने असले भंगार खेळ खेळण्यापेक्षा असली डाव खेळावा आणि मराठ्यांना आरक्षण देऊन टाकावे.

मनोज जरांगे पाटील पुढे म्हणाले, “गोरगरीबांचे मन जिंकण्याची उत्तम संधी सरकारकडे आहे. मराठे सरकारला कधीही विसरणार नाहीत. आम्हाला आरक्षण मिळाले तर आम्ही सरकारचे आभार मानू. एक एक दिवस उपोषणाला मुदतवाढ देण्यापेक्षा आमच्या मागण्या मान्य कराव्यात.

शौचालय, पाणी, हॉटेल बंद केल्यामुळे व्यक्त केला संताप- आंदोलकांना पाणी आणि जेवण मिळाले नाही, याबाबत बोलताना जरांगे पाटील म्हणाले, पोलिसांनी आजूबाजूच्या परिसरातील शौचालये बंद केले आहेत. तसेच या परिसरातील चहाच्या टपऱ्या, खाण्यापिण्याची हॉटेल बंद केले आहेत. आंदोलकांना पाणीही मिळू नये, अशी व्यवस्था केली आहे. त्यामुळे काही आंदोलक सीएसटी रेल्वे स्थानकात आसरा घेण्यासाठी गेले. सरकार इंग्रजांपेक्षाही बेकार



झाले, अशी टीका जरांगे पाटील यांनी केली. मुंबईत जर आम्हाला अन्नपाणी बंद करणार असाल तर तुमच्याही सभा महाराष्ट्रात कशा होतील, हे आम्ही पाहू, असे आव्हान मनोज जरांगे पाटील यांनी दिले. तुमच्या सभांना, रेस्ट हाऊसला जाणाऱ्या पाईपलाईन बंद करू, असेही ते म्हणाले.

आंदोलनाबाबत मुख्यमंत्री फडणवीस काय म्हणाले? मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनाला एक दिवसाची परवानगी देण्यात आली होती. त्यामुळे किती दिवस आंदोलन चालणार? असा प्रश्न विचारला असता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, आंदोलनाला एक दिवसाची परवानगी मिळाली होती. मात्र त्यांनी पुन्हा परवानगी मागितली आहे. कायद्याच्या चौकटीत राहून उच्च न्यायालयाच्या निर्देशांचे पोलीस पालन करतील. आंदोलनकर्ते आणि प्रशासन यांच्यातील हा प्रश्न आहे.

मराठा आंदोलकांनी जेवणाची स्वतःच व्यवस्था केली असून टेम्पोमधून जेवण बनविण्याचे साहित्य आणि बॅगा घेऊन मुंबई गाठली आहे. तर अनेकजण महिनाभराचा शिधा, भांडी असे सर्वच साहित्य सोबत आणले आहे. बहुसंख्य मराठा आंदोलकांनी टेम्पोमध्येच खिचडी, तसेच चहा तयार केला. अनेकजण घरून आणलेली चटणी - भाकर खात होते. तर काहीजण मोठ्या प्रमाणात बिस्कीटचे पुडे व फरसाणची पाकिटे घेऊन आले आहेत. हा सुका खाऊ घेण्यासाठी मराठा आंदोलकांची झुंबड उडाली होती.

मनोज जरांगे पाटील यांचं आंदोलन सुरुच राहणार, मिळाली एक दिवसाची मुदतवाढ मनोज जरांगे पाटील यांच्या मुंबईतील आझाद मैदानातील उपोषणाबद्दल मोठी बातमी समोर आली आहे. मुंबई पोलिसांनी एक दिवसाची परवानगी दिली होती. मात्र, मराठा आंदोलकांकडून आज दिवसभर झालेला घटनाक्रम पाहता आणखी काही कडक नियम व अटी पोलिसांकडून लावण्यात आले आहेत.

विकणे /भाड्याने देणे आहे
वासूद रोड वरील पाण्याच्या टाकीच्या उत्तरील बाजुस असणाऱ्या शिनगारे प्लॉट मधील क्लिअर टायटल प्रॉपर्टी (ट्वीन बंगलो) विकणे आहे.
संपर्क : डी. बी. शिंदे
मो.: ९५७९४२१४६५ ८२७५२७४२५३
पत्ता: अल्टिमेट जिमच्या समोर, सांगोला

## वात्रटिका

**जन सागर**

पेटून उठले त्यांचा तर
आता निर्धार पक्का आहे...
धडकी तर भरली आहेच
पण हा मोठा धक्का
आहे...।।
महासागराला भेटायला
जन सागर लोटला...
कळून चुकले आता तो
जो आधी किरकोळ
वाटला...।।

**हणमंत पडवळ**
**धाराशिव**
**८६९८०६७५६६**

निरामय पॅरालिसिस सेंटर
निरामय आयुर्वेद, पंचकर्म, योगा अॅण्ड फिजिओथेरपी सेंटर
ISO 9001:2015
खात्रीशीर उपचार 100% गॅरंटी आयुर्वेदिक व अलोपॅथी तज्ञांच्या निगराणीमध्ये
कितीही जुने पॅरालिसिस असो आयुर्वेदिक व अलोपॅथी उपचार पद्धतीने पंधरा ते वीस दिवसानंतर रिझल्ट येण्यास सुरुवात होते. हात काम करत नाही, चालता येत नाही, ब्रेनचा कंट्रोल जाणे बेडवर आहात काळजी करु नका खात्रीशीर उपचार
नांत आपुलकीचं, जिव्हाळ्याचं, माणुसकीचं आणि आधाराचं
समाजातील प्रत्येक घटकाशी ऋणानुबंध जपणारी संस्था
मोबाईल नं. 9503310568
पत्ता: गोळवलकर हॉस्पीटल च्या पाठीमागे, सुळे नगर, मोहोळ, जि. सोलापुर

## अनेक आमदार खासदारांसह मोहिते पाटलांचा देखील जंरागे यांच्या आंदोलनाला पाठिंबा

अकलूज (कटूसत्य वृत्त):- मराठा समाजाच्या आरक्षणाच्या न्याय्य मागणीसंदर्भात खासदार धैर्यशील मोहिते पाटील यांनी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र लिहून तातडीने कार्यवाही करण्याची मागणी केली आहे.

मराठा समाज गेल्या अनेक वर्षांपासून सामाजिक न्याय आणि समान संधींसाठी आरक्षणाची मागणी करत असून, सध्या मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वाखाली शांततामय आंदोलन सुरू आहे



त्यास खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांनी पाठिंबा दर्शवला.

खा.मोहिते पाटील यांनी पत्रात नमूद केले की, मराठा समाजातील लाखो तरुण, विद्यार्थी आणि शेतकरी यांच्या भविष्याचा प्रश्न या मागणीशी जोडला गेला आहे. त्यामुळे सरकारने संवेदनशीलतेने आणि तातडीने यावर निर्णय घेणे गरजेचे आहे.

सामाजिक समतेच्या दृष्टिकोनातून मराठा आरक्षणाला प्राधान्य द्यावे, अशी अपेक्षा त्यांनी मुख्यमंत्र्यांना लिहिलेल्या पत्रात व्यक्त केली.

# संपादकीय

## विकृतीला लगाम!

हास्य हे आपल्या जीवनाचा अविभाज्य भाग आहे. यामुळे मनावरचा ताण हलका होतो. आयुष्यातील नीरसता दूर होऊन आनंद वाढतो. परंतु जेव्हा हास्याचे रूपांतर उपहासात होते, जेव्हा कोणाच्या भावनांना किंवा प्रतिष्ठेला धक्का पोहोचवला जातो तेव्हा ते मानवी, नैतिक आणि कायदेशीर निकषांवर ग्राह्य धरले जाऊ शकत नाही. अशा कृती अहंकार, असभ्यता आणि असंवेदनशीलतेचीच उदाहरणे ठरतात. अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या नावाखाली कुणाच्याही व्यक्तिमत्त्वाची खालच्या पातळीवर जाऊन थट्टा करणे, त्या व्यक्तीला उपहासाचे पात्र बनवणे किंवा समाजातील दुर्बल घटकांवर वाट्टेल ते विनोद करण्याची परवानगी दिली जाऊ शकत नाही.

गेल्या काही वर्षांत या स्वातंत्र्याचा गैरवापर वाढत चाललेला दिसतो आहे. समाजात वैमनस्य पसरविणे, एखाद्या वर्गाविरुद्ध अशोभनीय टिप्पणी करणे, धार्मिक भावना दुखावणे ही प्रकरणे हल्ली सर्रास घडताना दिसताहेत. राजकीय मंडळी असोत वा तथाकथित सोशल ॲक्टिव्हिस्ट असोत; उपहासात्मक टीकेची पातळी सोडण्याच्या शर्यतीत कुणीच मागे राहिलेले नाहीत. अशा परिस्थितीत सर्वोच्च न्यायालयाने दिलेले आदेश विशेष महत्त्वाचे ठरतात. न्या. सूर्यकांत आणि न्या. जोयमाल्या बागची यांनी सरकारला दिलेल्या मार्गदर्शक सूचना व कठोर भाष्य यामुळे या प्रवृत्तीवर अंकुश बसविणे आवश्यक झाले आहे. स्पाइनल मस्न्युलर ॲट्रॉफी (एसएमए) या आजाराने पीडित व्यक्तींचा समय रैना याने उपहास केल्याच्या प्रकरणावर हा आदेश देण्यात आला आहे.

दिव्यांगांचा उपहास करण्याच्या या विकृत मानसिकतेकडे गांभीर्याने पाहताना न्यायालयाने स्पष्ट निर्देश दिले आहेत की ज्या स्तरावर हा उपहास झाला, त्याच स्तरावर सार्वजनिक माफी मागितली जावी. म्हणजेच केवळ औपचारिक माफी पुरेशी ठरणार नाही, हे न्यायालयाने स्पष्ट शब्दांत बजावले आहे. सोशल मीडियावर प्रेक्षकसंख्या, फॉलोअर्स वा व्ह्यूज वाढविण्यासाठी ज्या प्रकारे कुणाचाही उपहास केला जातो, थट्टा केली जाते, शेरेबाजी केली जाते त्या प्रवृत्तीवर अंकुश आणण्याची गरज बऱ्याच काळापासून जाणवत होती. न्यायाधीशांच्या निरीक्षणामुळे या गोष्टींना नवे गांभीर्य प्राप्त झाले आहे. फुटकळ विनोदप्रधान कार्यक्रम, इंटरनेटवर सादर होणारी नाटके वा रील्स आणि तथाकथित इन्फ्लूएन्सर यांच्याकडून होणारे उपहासाचे प्रयोग हे समाजात निष्काळजीपणे सुरू आहेत.

हे लोक स्वतःला समाजातील विशिष्ट व्यक्ती असल्याचे भासवतात, त्यांच्या फॉलोअर्सची व प्रेक्षकांची संख्या सांगून बढाया मारतात; परंतु प्रश्न असा आहे की, कुणाच्या वैयक्तिक जीवनावर, अपंगत्वावर वा इतर वैशिष्ट्यांवर थट्टा करण्याचा अधिकार त्यांना कुणी दिला? हेट स्पीच व त्याचे सोशल मीडियावरील प्रसारण याचे दुष्परिणाम समाजाने पाहिले आहेत. छोट्या टिप्पणीमुळे कधी कधी कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होतो. एकदा अशा प्रकारांवर कारवाई झाली की तथाकथित बुद्धिजीवींची फळी सक्रिय होताना दिसते. पण या कॉमेडियन आणि इन्फ्लूएंसरना आपली प्रेक्षकसंख्या व जाहिरात महसूल वाढवायचा असतो. उपहासात्मक टिप्पणी व प्रक्षोभक वक्तव्यांच्या जोरावर ते बक्कळ पैसा कमावतात. याच कारणामुळे सर्वोच्च न्यायालयाने ही बाब गंभीरपणे घेतली व ती अभिव्यक्ती स्वातंत्र्याऐवजी व्यावसायिक क्रियाकलाप असल्याचे नमूद केले.

सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले की व्यावसायिक फायद्यासाठी केलेल्या टिप्पणी आणि वादग्रस्त भाषणांना अभिव्यक्ती स्वातंत्र्याचे संरक्षण मिळू शकत नाही. सर्वोच्च न्यायालयाने आरोपींवर दंड ठोठावण्याचा विचार केला आहे आणि तो दंड दिव्यांगांच्या उपचारासाठी वापरता येईल असेही स्पष्ट केले आहे. नैतिकतेच्या दृष्टिकोनातूनही प्रश्न महत्त्वाचा आहे. इतरांच्या विकलांगतेवर किंवा त्यांच्या परिस्थितीवर थट्टा करण्याचा हक्क कुणालाच असू शकत नाही. अशा उपहासामुळे सामाजिक संतुलन ढासळते. आजकाल हेट स्पीच संदर्भातील याचिका न्यायालयात नेल्या जातात व ते आवश्यकही आहे. पण सोशल मीडियाच्या नावाखाली एखाद्याच्या गोपनीयतेवर शिंतोडे उडविणे हे स्वीकारार्ह ठरू शकत नाही. या निर्णयाचे महत्त्व असे की, कॉमेडियन वा इन्फ्लूएन्सर यांच्या सतत वाढत्या उपहासात्मक वर्तनावर आता कठोर लगाम लावणे अपरिहार्य झाले आहे.

इन्स्टाग्राम, व्हॉट्सॲपसारख्या प्लॅटफॉर्मवर अशा टिप्पण्या वा व्हिडिओमुळे तणाव निर्माण होतो. हे प्रसंग केवळ मनोरंजनापुरते मर्यादित राहत नाहीत, तर गंभीर सामाजिक परिणाम घडवून आणतात. त्यामुळे सोशल मीडिया प्लॅटफॉर्मना अशा सामग्रीचे फिल्टरिंग करण्याची जबाबदारी घ्यावी लागेल. सध्या कुठलीही रील किंवा टिप्पणी लोकप्रिय झाली की लगेच ती कमाईचे साधन बनते. उलटपक्षी, अशा व्यक्तींवर कठोर कारवाई करून त्यांची अकाउंट्स ब्लॅकलिस्ट करून ब्लॉक केली गेली पाहिजेत. सर्वोच्च न्यायालयाने आपले कार्य केले आहे. लवकरच सरकारही मार्गदर्शक सूचना जारी करेल आणि कदाचित कठोर कायदेशीर तरतूद करेल.

मात्र, समस्या एका आदेशाने सुटेल असे वाटत नाही. अशा परिस्थितीत सामान्य नागरिक, सामाजिक संस्था, स्वयंसेवी संघटना व विशेषतः तथाकथित बुद्धिजीवी यांनी सकारात्मक दृष्टिकोन घेऊन पुढे येणे गरजेचे आहे. तेव्हाच कॉमेडियन व सोशल इन्फ्लूएंसर यांच्या ताळतंत्र सोडणाऱ्या टिप्पण्यांवर प्रभावी नियंत्रण शक्य होईल.

# साथीचे आजार टाळण्यासाठी योग्य ती खबरदारी गरजेची

राज्याला पावसाने चांगलेच झोडपल्याने राज्यात सध्या साथीच्या आजाराने डोके वर काढले आहे. सार्वजनिक आरोग्य विभागाच्या आकडेवारीनुसार जानेवारी ते १४ ऑगस्ट २०२५ या कालावधीत राज्यभरात एन्फ्लुएंजा आजाराचे ( फ्लयू ) ६६३ रुग्ण आढळले आहेत यापैकी १४ रुग्ण मागील दीड महिन्यात आढळले असून तीन रुग्णांचा मृत्यू झाला आहे. अर्थात ही सरकारी आकडेवारी आहे. रुग्णांची संख्या यापेक्षा कितीतरी अधिक असण्याची शक्यता आहे केवळ फ्लयू आजारानेच नव्हे तर डेंग्यू, मलेरिया, चिकणगुणिया यासारख्या साथीच्या आजाराने राज्यातील नागरिक हैराण झाले आहेत. साथीच्या आजाराने रुग्णांची संख्या वाढत चालल्याने आरोग्य विभागाची डोकेदुखी वाढली आहे. राज्यात डेंग्यू, मलेरिया आणि चिकणगुणियाचे रुग्ण मोठ्या प्रमाणात आढळत आहे विशेषतः राज्यातील महापालिका क्षेत्रात डेंग्यू आणि मलेरियाचे रुग्ण आढळत आहे नागपूरसह संपूर्ण विदर्भात देखील डेंग्यूचे रुग्ण आढळत आहे. पुण्यातही जवळपास तीच परिस्थिती आहे त्यामुळे आरोग्य खाते अलर्ट मोडवर आले आहे. मागील काही दिवसांपासून विशेषतः पावसाला सुरवात झाल्यापासून साथीच्या आजाराने डोके वर काढायला सुरवात झाली आहे. डेंग्यू, मलेरिया, चिकणगुणिया यासोबतच सर्दी, खोकला, डोकेदुखी, ताप, शिंका येणे यानेही नागरिक त्रस्त झाले आहेत. पाच वर्षांपूर्वी राज्यातच नव्हे तर संपूर्ण जगात कोरोनाने हाहाकार उडवला होता. कोरोना देखील संसर्गजन्य रोग होता त्यातून आपण आता कोठे सावरलो आहोत तोच आता या साथीच्या आजाराने डोके वर काढले आहे अर्थात हे साथीचे आजार कोरोना इतके धोकेदायक नसले तरी त्याकडे दुर्लक्ष करणे ही मोठी चूक ठरू शकते म्हणूनच आरोग्य खात्याने ही साथ मोडून काढण्यासाठी कंबर कसली आहे. ही साथ अधिक वाढू नये म्हणून आरोग्य खाते सर्वोतोपरी प्रयत्न करीत आहे. आरोग्यखाते त्यांची जबाबदारी पार पाडतच आहे पण आरोग्य खात्यासोबतच नागरिकांनी आणि प्रशासनाने देखील ही साथ आणखी वाढू नये यासाठी याबाबत काळजी घ्यायला हवी. वास्तविक दरवर्षी पावसाळा सुरू झाला की साथीचे आजार पसरतात पण ते पसरू नये यासाठी पावसाळयापूर्वीच खबरदारी घेतली जात नाही. या साथीबाबत नगरपालिका असो की महानगरपालिका उदासीनच दिसून येते. दरवर्षी कचऱ्याचे ढीग, घाणीचे साम्राज्य, सांडपाण्याचे डबके यांचे वेळीच सर्वेक्षण केले जात नाही. त्यामुळे शहरात जागोजागी असलेले कचऱ्याचे ढीग, सांडपाण्याचे डबके, आणि घाणीचे साम्राज्य पसरलेले दिसते. याची वेळीच विल्हेवाट लावली गेली असती तर आज ही वेळ आली नसती. डेंग्यू, मलेरिया, चिकणगुणिया यासारखे साथीचे आजार हे डासांमुळे होतात. ज्या ठिकाणी घाणीचे साम्राज्य असते अशा ठिकाणी डासांची उत्पत्ती होते. शहरातील हे घाणीचे साम्राज्य कमी झाले की डासांचे प्रमाणही कमी होईल. प्रशासनाने शहरातील घाणीचे साम्राज्य कमी करण्यासाठी तसेच शहरात कचऱ्याचे ढीग पसरू नयेत यासाठी युद्धपातळीवर प्रयत्न करायला हवेत. तसेच शहरात सर्वत्र औषध फवारणी करावी. डेंग्यूला कारणीभूत ठरणारा एडिस इजिप्ती हा डास गोड्या पाण्यात राहतो. डेंग्यूचे डास पसरू नयेत यासाठी नागरिकांनीही काळजी घ्यावी. नागरिकांना आपल्या घराच्या परिसरात, छतावर, भांड्यामध्ये, जुन्या वस्तूंमध्ये पाणी साचणार नाही याची काळजी घ्यावी. आपल्या घराचा परिसर स्वच्छ राहील याची काळजी सर्व नागरिकांनी घ्यावी. आठवड्यातील एक दिवस कोरडा दिवस पाळावा. याशिवाय नागरिकांनी सकस आहार घेणे, भरपूर पाणी पिणे, ज्यूस पिणे, नियमित व्यायाम करणे, अराम करणे, पुरेशी झोप घेणे आवश्यक आहे. कोणताही आजार किरकोळ आजार आहे असे समजून अंगावर काढणे धोकादायक ठरू शकते. नागरिकांनी आजाराची लक्षणे दिसताच डॉक्टरांचा सल्ला घ्यावा. नागरिकांनी वैयक्तिक स्वच्छतेपासून सार्वजनिक स्वच्छतेपर्यंत विशेष काळजी घ्यावी. सरकारने प्रिंट मीडिया, इलेक्ट्रॉनिक मीडिया, सोशल मीडियाद्वारे याबाबत जनजागृती करावी. शाळा महाविद्यालयातही याबाबतीत प्रबोधन करावे. वैयक्तिक, सामूहिक व शासकीय पातळीवर व्यापक प्रयत्न करूनच साथीच्या आजाराशी दोन हात करता येईल.

श्याम ठाणेदार
दौंड जिल्हा पुणे
९९२२२५४६२९५

# बालसंगोपन संस्थांतील मुलांच्या मानसिक आरोग्यासाठी मासूम

मुंबई, (कटूसत्य वृत्त):- राज्यातील बालसंगोपन संस्थांमध्ये (Child Care Institutions - CCI) राहणाऱ्या समस्याग्रस्त आणि विधी संघर्षीत मुलांना मानसिक आरोग्यसेवा व समुपदेशन करण्यासाठी महिला व बालविकास विभाग एमपॉवर संस्थेच्या माध्यमातून मासूम प्रकल्प राबवित आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संवेदनशील निर्णयामुळे या प्रकल्पाचा आजपर्यंत ३,३३७ मुलांना लाभ झाला असून एकूण ९५९३ वैयक्तिक समुपदेशन सत्रे पार पडली आहेत. महाराष्ट्रातील महिला व बालविकास विभाग (WCD) राज्यातील बालकल्याण व मानसिक आरोग्याच्या कार्याला बळकटी देण्यासाठी, आदित्य बिर्ला एज्युकेशन ट्रस्टच्या Mpower या उपक्रमामार्फत 'मासूम' प्रकल्प राबवीत आहे. या प्रकल्पांतर्गत अडचणीत असलेल्या व विधी संघर्षीत मुलांना, जे बाल संगोपन संस्थांमध्ये (Child Care Institutions - CCIs) राहतात, त्यांना मानसिक आरोग्य सेवा व समुपदेशन (counselling) पुरवले जाते. हा सार्वजनिक-खाजगी भागीदारीचा उपक्रम, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली सुरू करण्यात आला आहे. सेवेची भावना या उद्देशाने व बांधिलकीने Mpower व आदित्य बिर्ला एज्युकेशन ट्रस्टच्या संस्थापिका व अध्यक्षा, श्रीमती नीरजा बिर्ला यांनी अनेक उपक्रम राबवले आहेत. त्यांच्या प्रयत्नातून १८० दशलक्षाहून अधिक लोकांपर्यंत पोहोचून, Mpower हे दक्षिण आशियातील मानसिक आरोग्य साक्षरता, क्षमता-वृद्धी आणि सामुदायिक संपर्कावर लक्ष केंद्रित करणारे सर्वांत मोठे खासगी व्यासपीठ ठरले आहे. महिला व बालविकास विभाग (WCD) सोबतच्या सामंजस्य करारानंतर हा प्रकल्प मुंबई, पुणे, ठाणे, नागपूर आणि नाशिक या विभागांमध्ये राबवला जात आहे. एकूण १९ बालसंगोपन संस्थांना पाच मानसशास्त्रज्ञाच्या टीमकडून सेवा दिल्या जात आहेत. या प्रकल्पांतर्गत मानसशास्त्रज्ञ रोटेशन पद्धतीने सीसीआयला भेट देतात, स्तिथीपरत्वे समुपदेशन करतात, मुलांचे मानसिक आरोग्य स्क्रिनिंग करतात आणि गरजेनुसार थेरपी सेवा पुरवतात. याशिवाय गंभीर प्रकरणांमध्ये बालकल्याण समिती (CWC) आणि किशोर न्याय मंडळाला (गगइ) तज्ज्ञांचे सहकार्य दिले जाते. थेरपिस्ट काही मुलांच्या आरोग्य आणि मानसिक परिस्थितीनुसार त्यांचे तणाव मापन पट्टी (Stress Scale), आक्रमकता मापन पट्टी , स्थिती-गुणधर्म चिंतामापन चाचणी (State Trait - nxiety Test), मानसिक आरोग्य व कल्याण मापन पट्टी (Psychological Well-Being Scale) यांसारख्या साधनांद्वारे सखोल परीक्षण केले जाते. मुलांच्या कुटुंबियांनाही समुपदेशनाची सुविधा दिली जाते. पालकांचे समुपदेशन केल्याने , मुले घरी परतल्यावर त्यांना पुर्वीप्रमाणे मोकळे वातावरण मिळेल हा या प्रकल्पाचा उद्देश आहे.

# खेळाडूंना दिलेले २२ कोटींचे रोख बक्षिस खेळाडूंच्या कष्टाला दिलेली दाद- उपमुख्यमंत्री पवार

पुणे (कटूसत्य वृत्त):- ''राज्यातील यशस्वी खेळाडूंना दिलेली २२ कोटींची रोख बक्षिसे ही त्यांच्या कष्टाला दिलेली खरी दाद आहे,'' असे प्रतिपादन उपमुख्यमंत्री तथा पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी केले. राष्ट्रीय क्रीडा दिनाचे औचित्य साधून म्हाळुंगे बालेवाडी येथील शिवछत्रपती क्रीडा संकुल गजबजून गेले होते. महाराष्ट्र शासनाच्या शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या वतीने आयोजित या सोहळ्यात आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय स्तरावरील ३३१ विजेत्यांचा सन्मान करण्यात आला. या खेळाडूंना एकूण २२ कोटी ३१ लाख रुपयांची पारितोषिके देण्यात आली.

उपमुख्यमंत्री पवार यांच्या हस्ते १३ आंतरराष्ट्रीय व ३१८ राष्ट्रीय स्तरावरील खेळाडूंना पारितोषिके देण्यात आली. सुवर्णपदक विजेत्यांना प्रत्येकी ७ लाख, रौप्यपदक विजेत्यांना ५ लाख आणि कांस्यपदक विजेत्यांना ३ लाख रुपयांचे बक्षीस जाहीर करण्यात आले. कार्यक्रमात ''मिशन लक्ष्यवेध हाय परफॉर्मन्स सेंटर'' या महत्वाकांक्षी योजनेच्या लोगोचे अनावरणही उपमुख्यमंत्री पवार आणि क्रीडा मंत्री ॲड. कोकाटे यांच्या हस्ते झाले.

या प्रसंगी ऑलिम्पिक पदक विजेता स्वप्नील कुसाळे, आमदार बाबाजी काळे, क्रीडा आयुक्त शीतल तेली-उगले, सहसंचालक सुधीर मोरे, माजी क्रीडा प्रशासक नामदेव शिरगांवकर, प्रशिक्षक संजय शेटे आदी मान्यवर उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री पवार म्हणाले की, महाराष्ट्राच्या खेळाडूंनी सलग दुसऱ्यांदा राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत पदकांचे द्विशतक झळकावले आहे, जे राज्याच्या क्रीडा परंपरेला अभिमानास्पद आहे. ''खेळाडूंच्या मेहनतीतून राज्याला मिळालेले यश हे १३ कोटी महाराष्ट्राच्या जनतेचे सामूहिक अभिमानाचे कारण आहे. खेलो इंडियासह इतर आंतरराष्ट्रीय स्पर्धांसाठी क्रीडामंत्री माणिकराव कोकाटे यांनी केलेल्या ५८ कोटींच्या निधीच्या मागणीस तात्काळ मंजुरी दिली आहे. खेळाडूंना आवश्यक त्या सुविधा देऊन महाराष्ट्राने ऑलिम्पिकसह जागतिक स्तरावर वर्चस्व निर्माण करावे, हे आमचे ध्येय आहे,'' असे त्यांनी नमूद केले.

त्यांनी पुढे सांगितले की, बालेवाडीतील शिवछत्रपती क्रीडा संकुलात देशातील पहिले ऑलिम्पिक संग्रहालय उभारण्याचा निर्णय घेतला आहे. हे संग्रहालय केवळ खेळाडूंच्या कामगिरीचा ऐतिहासिक दस्तऐवज नसून, नवीन पिढीला प्रेरणा देणारे व खेळात शिस्त, मूल्ये व संस्कार रुजवणारे केंद्र ठरणार आहे. क्रीडा मंत्री ॲड. कोकाटे म्हणाले की, ''आरोग्यदायी, क्रीडामय महाराष्ट्र हे आमचे ध्येय आहे. राज्याचे नवीन क्रीडा धोरण लवकरच जाहीर करण्यात येईल. हे धोरण खेळाडूंना न्याय देणारे व त्यांच्या प्रगतीस चालना देणारे असेल. त्यातून महाराष्ट्राचे खेळाडू आंतरराष्ट्रीय व ऑलिम्पिक स्पर्धांमध्ये अधिकाधिक पदके जिंकतील.''

फेब्रुवारीत उत्तराखंड येथे पार पडलेल्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत महाराष्ट्राने ५५ सुवर्ण, ७० रौप्य व ७६ कांस्य अशी एकूण २०१ पदके पटकावून प्रथम क्रमांक मिळविला होता. या यशाचे स्मरण करत राज्य सरकारने ३१८ राष्ट्रीय विजेते व १३ आंतरराष्ट्रीय विजेते खेळाडूंचा गौरव केला. राज्याच्या क्रीडा धोरण २०१२ नुसार खेळाडू व मार्गदर्शकांना एकूण २८ कोटी ७० लाख रुपयांची पारितोषिके वितरित करण्यात आली.

दरम्यान, वार्षिक १६० कोटी रुपये खर्च असलेल्या ''मिशन लक्ष्यवेध'' या महत्वाकांक्षी योजनेचाही शुभारंभ आज झाला. पहिल्या टप्प्यात ॲथलेटिक्स, हॉकी, कुस्ती, वेटलिफ्टिंग, रोईंग व लॉन टेनिस या सहा क्रीडा प्रकारांना प्राधान्य देण्यात आले असून उच्च दर्जाचे प्रशिक्षण, आधुनिक उपकरणे व तज्ज्ञ प्रशिक्षकांची मदत खेळाडूंना देण्यात येईल. या योजनेमुळे महाराष्ट्राचे खेळाडू आंतरराष्ट्रीय दर्जाच्या सुविधांमध्ये सराव करून जागतिक स्तरावर पदके जिंकण्याची संधी मिळेल. क्रीडा आयुक्त शीतल तेली-उगले यांनी प्रास्ताविक केले. त्यांनी राज्यातील क्रीडा विकासाची पार्श्वभूमी, केंद्र व राज्य शासनाच्या योजनांचा उल्लेख केला. आभारप्रदर्शन सहसंचालक सुधीर मोरे यांनी केले.

## प्रबोधन

# सामाजिक डान्सबार बंदी। हितकारी होती

मदिरा आणि मदिराक्षी हे दोन विषय सज्जनांना अप्रिय; तर दुर्जनांना ते प्रिय, प्रियतर, प्रियतम असतात! सज्जन माणूस मद्यापासून दूर राहातो आणि परस्त्रीपासून तर अतिदूर राहातो. पण दुर्जन मद्यापासून मदिराक्षीपर्यंतचा प्रवास न थकता करीत असतो. सारा जन्म तो या दोन विषयांतच गमावतो.

राम गणेश गडकरी यांनी एकच प्याला हे नाटक लिहून मद्यपानाचे दुष्परिणाम समाजाला सांगितले, पण ते ऐकले फक्त निर्व्यसनी सज्जनांनीच! मद्यपी दुर्जनांना एकच प्याला बघायला वेळ कुठे होता? आणि वेळ असला तरी शुद्ध नको का असायला? एकूण समाज होता तिथेच राहिला. प्रत्येक वेळी एकच प्याला घेत राहिला. आदिवासींपासून सर्व उच्चभ्रू, तथाकथित लब्धप्रतिष्ठ मद्याची भक्ती करीत होते, करीत आहेत आणि करीत राहातील. बिचारे निष्पाप केशवसुत स्फूर्ती कविता लिहून निष्कारण बदनाम झाले. देव दानवा नरे निर्मिले हे सत्य सांगण्यासाठी त्यांना सोमरस घेण्याची काय गरज होती? समाजमनावर मद्याने आपली केवढी छाप टाकली होती, ते स्फूर्ती कवितेच्या अनुषंगाने स्पष्ट झालं.

गांधीयुगाने मात्र या दोन्ही व्यसनांतून समाजाला मुक्त करण्याचे खूप प्रयत्न केले. राष्ट्रीय चारित्र्य हा शब्द गांधीजी आणि त्यांच्या अनुयायांनी प्रचारातही आणला. त्याचा प्रसारही केला. माजी राष्ट्रपती राधाकृष्णन म्हणाले, राष्ट्राला अधःपातापासून वाचवण्यासाठी चारित्र्यनिर्मिती हाच एक हमखास मार्ग असतो. पण गांधी-नेहरू युग संपलं आणि आज दारूबंदी हा विषय अडगळीत पडला आहे. मद्याचा मुक्त व्यवहार समाजाने स्वीकारला आहे. आज खेड्यापाड्यांपर्यंत बियर बार निघालेत. भल्याभल्यांच्या चारित्र्याचा अधःपात होत आहे. परिणामी, राष्ट्र तर अधःपाताच्या खोल दरीत कधीच कोसळलं आहे. आज आमदार, खासदार, राज्यपाल, महापौर अशा अनेक दिग्गजांचा मद्यनिर्मितीतही सहभाग आहे. जुगारी अड्ड्यांपासून ते डान्सबारसारख्या राष्ट्रविघातक कार्याद्वारे बरंच सेवाकार्यपुण्य त्यांनी गाठीस बांधलं आहे.

मुंबईची स्वातंत्र्योत्तर काळाची वाटचाल पाहिली, तर मुंबई हे महाराष्ट्राला लाभलेलं वरदान आहे, की कधीही ज्यातून मुक्त होता येणार नाही असा तो दुर्धर शाप आहे, असं वाटतं.

वाईट तितुके इथे पोसले ।
भलेपणाचे भाग्य नासले ।
या पृथ्वीच्या (अर्थात मुंबईत) पाठीवर
ना माणसास आधार ।

अजब तुजे सरकार- ग.दि.माडगूळकर यांच्या गीतातील या ओळी मुंबईतील जुगार, डान्सबार, अवैध धंदे यांचं वर्णन करण्यास छान उपयोगी पडतात. तरी शासक मंडळीतील काही सत्प्रवृत्त नेतेमंडळी डान्सबार संस्कृतीची मुळे उखडून मुंबईच्या बिघडत जाणाऱ्या चेहऱ्याचं रूप टिकवण्यासाठी जिवाचा आटापिटा करतात, ती धडपड धन्य आहे. अशा नेत्यांना शीलम्? परम भूषणम हे नीट उमजलेलं आहे. जगद्गुरू तुकोबाराय यांचं प्रबोधन हेच कर्म करीत असतं.

पापाची वासना नको दावू डोळा ।
त्याहून आंधळा बराच मी ।। हे मनात ठेवूनच महाराष्ट्र राज्य सरकारने डान्सबार बंद केले होते आणि ते योग्यही होतं.

चारित्र्य हा मानवी जीवनाच्या उन्नतीचा मूलमंत्र आहे हा विज्ञाननिष्ठ पुरोगामी विचारवंत स्वामी विवेकानंदांचा विचार डान्सबारबंदी मागे नक्कीच होता. पण तो सर्वोच न्यायव्यवस्थेने रद्द ठरवला. चारित्र्यहीन व्यक्ती कितीही शिकलेली असली, तरी ती पशूहून भयंकर असते. हा भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी सांगितलेला विचार न्यायव्यवस्थेला बहुधा मान्य नसावा. न्यायव्यवस्थेने राज्यघटनेच्या आत्म्याची ओळख करून घ्यावी, की छापील शब्दाला चिकटून बसावं ? भगिनी निवेदिता म्हणतात, परिस्थिती कोणतीही असो राष्ट्रीय चारित्र्य सतत प्रकट होत राहिलं पाहिजे. राष्ट्राचं हृदय शुद्ध असलं पाहिजे.

डान्सबारतर्फे राष्ट्राच्या हृदयाची शुद्धता साध्य होईल का?स्वातंत्र्य म्हणजे स्वैराचार असा अर्थ न्यायव्यवस्था घेते काय?डान्सबारमध्ये जाणारी व्यक्ती आपल्या कुटुंबियांच्या जगण्याचा पर्यायाने त्यांच्या जगण्याच्या स्वातंत्र्याचा सत्यानाश करीत असते, हे शब्दज्ञानी न्यायपालकांना का कळत नाही ?

पाश्चात्त्य विद्वान हर्बर्ट स्पेन्सर यांचा विचार चिंतनप्रेरक आहे. ते म्हणतात, माणसाला शिक्षणाबरोबर चारित्र्याचीही गरज असते. कारण चारित्र्यच माणसाचं रक्षण करते! आज आपण शिक्षणात क्रांतिकारी परिवर्तन करून ते सर्वंकष कसं होईल, याचा विचार व त्या अनुषंगाने कृती करीत आहोत. साखरशाळा, आश्रमशाळा, भटक्या विमुक्तांसाठी शाळा, अंध-अपंगांसाठी शाळा असा शिक्षणकार्याचा विस्तार करीत आहोत. पण त्याच्या जोडीला डान्सबारबंदी, शाळा-कॉलेज-हॉस्पिटल्स जवळ दारूविक्रीबंदी जर केली नाही, तर सगळे प्रयत्न वाया जातील. शिक्षणात आज मूल्यशिक्षण समाविष्ट करण्यात आलं आहे. पण वेगळ्या आणि स्वतंत्र नैतिक शिक्षणाची गरज आहे. नागरिकशास्त्रात नीतीशिक्षणाचा समावेश करून तो विषय राबवता येईल.

डान्सबारबंदी का करण्यात आली होती, हे न्यायव्यवस्थेने नीट समजून घेतलेलं नाही, असं दिसतं. जाणकार लिहितात, डान्सबारबंदीची मागणी एका रात्रीत झालेली नव्हती. मद्याचा महापूर आणि जोडीला छमछमचा नाद या दुष्ट चक्रात मुंबई, ठाणे, नवी मुंबई, रायगडमधील हजारो तरुण व अगदी महाविद्यालयीन विद्यार्थीही अडकले. अनेक शहरांमध्ये डान्सबारचं बस्तान बसत गेलं. हातावर पोट असलेली मंडळीही कर्ज काढून डान्सबारच्या विळख्यात अडकत गेली. अनेकांचे संसार उद्ध्वस्त झाले. हे वास्तव बंदीने अडवलं होतं. पण न्यायव्यवस्थेने समाजविघातक जुन्या वास्तवाला आपल्या दुर्दैवी निकालाने रस्ता मोकळा करून दिला आहे. यामुळे होणारं सामाजिक नुकसान न्यायव्यवस्थेच्या खात्यावरच जमा केलं पाहिजे. अशा वेळी समाजपुरुषाला, रात्र वैऱ्याची आहे, जागा राहा या खेरीज आपण काय म्हणणार? कारण-

डान्सबार बंदी । हितकारी होती
रक्षणार्थ होती । समाजाच्या ।। १
उच्छृंखल व्हावे । माणसाने किती
तुडवावी नीती । किती पायी ? ।।२
प्रवाहपतिता । स्वहित कळेना
रोज पुनः पुन्हा । करी चुका ।। ३
बंधनात अशा । पशूंना कोंडावे
मुक्त न सोडावे । हेच योग्य ।।४
कोंडूनी तयांना । सदाचार सांगा
सुधारता जागा । योग्य द्यावी ।।५
न्यायव्यवस्थेने । जपावे माणसा
सहाय्य विकासा । द्याया हवे ।।६
राज्यघटनेला आहे । मानवता प्रिय
न्यायाधीशा काय । कळेना हे? ।।७
राष्ट्रहितासाठी झटू सारेजण
आम्हा हाच प्राण । हितकारी ।।८



प्रा. डॉ. जे. बी. शिंदे

# मोहोळचे माजी नगराध्यक्ष हाजी शौकत तलफदार यांचे निधन

अनगर(कटूसत्य वृत्त):- नगरपरिषदेचे माजी प्रभारी नगराध्यक्ष तथा ज्येष्ठ मार्गदर्शक हाजी शौकत तलफदार यांचे दीर्घ आजाराने दुःखद निधन. गुरुवार दिनांक २८ ऑगस्ट रोजी मध्यरात्री एक वाजता त्यांची प्राणज्योत मालवली. रविवार दिनांक २८ ऑगस्ट रोजी दुपारी दोन वाजता मोहोळ येथील मुस्लिम कब्रस्तान येथे त्यांना दफन करण्यात आले. ग्रामपंचायत सदस्य नगरसेवक उपनगराध्यक्ष अशा विविध पदाच्या माध्यमातून विकास कामांना प्राधान्य देत विकास कामे केली आहेत. त्यांच्या



पाश्चात पत्नी दोन मुले दोन मुली असा त्यांचा परिवार आहे.

यावेळी शासकीय, सामाजिक, व्यावसायिक, शैक्षणिक सर्व स्तरातील हजारोच्या संख्येने लोक उपस्थित होते.

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, **संपादकःश्री.पांडूरंग हरिदास सुरवसे** यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-३, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर-४१३००३ येथे छापून येथूनच प्रसिध्द केले. कार्यालयः- एफ-३, वृंदावन पार्क, होटगी रोड सोलापूर-४१३००३
फोन/ फॅक्स(०२१७)२६०५०९१ **RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो.(९७६५३९०३३९) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो.(९६५७०६९०६९) कायदा सल्लागारः ॲड.खतीब वकील.**
It is owned by Shri Pandurang Haridas Survase, Editor, Publisher, Sanskruti Printing Press F-3, Vrundavan Park, Hotgi Road, Solapur 413003. Printed here F-3 Vrundavan Park Hotagi Road Solapur 413003 Published from Office - F-3 Vrindavan Park Hotgi Road Solapur 413003 Phone-0217-2605091 Editor Pandurang Suravase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No . MAHMAR 2006/17624**

# सोलापूर राष्ट्रवादी काँग्रेस जिल्हाध्यक्षपदाचा तिढा लवकरच सोडवू

सोलापूर (कटूसत्य वृत्त):- राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते बळिराम साठे यांच्या कार्यकर्त्यांनी जिल्हाध्यक्षपदाचा निर्णय लवकरच जाहीर करावा, अशी मागणी केली. या संदर्भात लवकरच निर्णय घेऊ असे आश्वासन पक्षाचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांनी दिले. दोन दिवसांपूर्वी मुंबई येथे पक्षाची प्रदेश पातळीवरील बैठक झाली. यावेळी उत्तरमधील कार्यकर्त्यांनी शिंदे यांची भेट घेतली. अडीच महिन्यापूर्वी साठे यांना अचानकपणे पदमुक्त करण्यात आले. त्यामुळे साठे गट नाराज आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची राज्य पातळीवरील पदाधिकाऱ्यांची बैठक नुकतीच मुंबईत पक्षाच्या कार्यालयात पार पडली. यावेळी उत्तर सोलापूर तालुक्यातून ज्येष्ठ नेते बळिराम साठे, तालुकाध्यक्ष प्रल्हाद काशीद, नागेश पवार, मनोज साठे हे उपस्थित होते. यावेळी तालुकाध्यक्ष प्रल्हाद काशीद यांनी प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांची भेट घेतली. यावेळी जिल्हाध्यक्षपदाच्या विभागणीचा निर्णय लवकर घ्यावा, अशी विनंती केली. जून महिन्यात तत्कालीन प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी बळिराम साठे यांना जिल्हाध्यक्ष पदावरून दूर करत मोहिते पाटील यांचे समर्थक वसंतराव देशमुख यांची नियुक्ती केली. यामुळे नाराज झालेल्या साठे यांनी त्यावेळी मोहिते पाटील व जयंत पाटील यांच्यावर उघड नाराजी व्यक्त करत पक्ष सोडण्याचा निर्णय जाहीर केला होता. मात्र त्यानंतर घडलेल्या घडामोडीमुळे त्यांनी आपला निर्णय रद्द केला. त्यावेळी जिल्हाध्यक्ष पदाची विभागणी करत सोलापूर शहर परिसरातील तालुक्यांसाठी साठे यांची पुन्हा नियुक्ती केली जाईल, असे आश्वासन देण्यात आले होते. मात्र अद्याप याबाबत पक्षाने निर्णय जाहीर केला नाही. यामुळे साठे गटाच्या कार्यकर्त्यात अस्वस्थता पसरली आहे. मुंबई येथील बैठकीच्या वेळी कार्यकर्त्यांनी आमदार रोहित पवार यांचीही भेट घेतली. त्यांनीही सोलापूरच्या निवडीबाबत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीपूर्वीच निर्णय घेऊ, असे आश्वासन दिले. प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांच्यासह इतर नेत्यांनी लवकर निर्णय घेऊ, असे आश्वासन दिल्यामुळे साठे गटाच्या आशा पल्लवीत झाले आहेत. या बैठकीच्या वेळी पक्षाध्यक्ष शरद पवार यांच्याशी मात्र चर्चा झाली नसल्याचे पदाधिकाऱ्यांनी सांगितले.

# पंढरपूर शहरात मुर्ती संकलनाचे १४ ठिकाणी केंद्र

## संकलन केंद्रावर ५६ कर्मचाऱ्यांची नियुक्ती



पंढरपूर (कटूसत्य वृत्त):- शहरातील घरघुतीसह सार्वजनिक मंडळाच्या मुर्ती गोळा करण्यासाठी पंढरपूर नगरपरिषदेच्या वतीने शहरात १४ ठिकाणी मुर्ती संकलन केंद्राची उभारणी केली आहे.

निर्माल्य गोळा करण्यासाठी फिरत्या वाहनांची व संकलन केंद्रावर व्यवस्था करण्यात आली आहे.यासाठी नगरपालिकेच्या ५६ कर्मचारी यांची नियुक्ती करण्यात आली असल्याची माहिती मुख्याधिकारी महेश रोकडे यांनी दिली.

गणेश विसर्जनासाठी नगरपालिका प्रशासनाच्या वतीने तयारी पुर्ण केली असून, विसर्जन ठिकाणी पुरेसा प्रकाश व्यवस्था, आवश्यक ठिकाणी बॅरेकेटींग करण्यात आले आहे. सद्यस्थितीत उजनी धरणातून नदीपात्रात पाणी सोडण्यात आले असून,नदीपात्रात गणेशमूर्ती विसर्जन करताना दक्षता घ्यावी.

विसर्जनाच्या वेळी लहान मुलांना नदीपात्रापासून दूर ठेवावे.पावसामुळे घाटावरील पायऱ्या निसरड्या होण्याची शक्यता असल्याने नागरिकांनी दक्षता घेवून सुरक्षित विसर्जन करावे, तसेच सुरक्षेच्यादृष्टीने विर्सजनासाठी प्रशासनाने निश्चित केलेल्या जागेवरच विसर्जन करावे असे आवाहनही मुख्याधिकारी रोकडे यांनी केले आहे.

**विसर्जनासाठी गणेशमुर्ती याठिकाणी जमा कराव्यात**

अर्बन बँक प्रशासकीय इमारतीसमोर, भोसले चौक गणेश मंदिरासमोर, शेटे पेट्रोलपंपा समोर, कॉलेज चौक बस स्टॉप जवळ, ठाकरे चौक, सावरकर चौक गजानन मेडिकल समोर, शिवतीर्थ शिवाजी महाराज चौक, महात्मा फुले पुतळ्यासमोर, महाद्वार चौक पोलीस चौकी जवळ, मुक्ताबाई मठ, अंबाबाई पटांगण, अहिल्या पुलाजवळ टेभुर्णी रस्ता, यमाई तलाव गेट जवळ टाकळी रोड, तसेच सार्वजनिक बांधकाम विभाग जवळ या ठिकाणी घरघुतीसह सार्वजनिक गणेश मंडळाच्या मुर्ती गोळा करण्यासाठी संकलन केंद्र उभारण्यात आले आहेत.

# पंढरपुरातून हजारो युवक मराठा आंदोलनात दाखल



पंढरपूर (कटूसत्य वृत्त):- मराठा आरक्षण मागणीसाठी मुंबई येथे मनोज जरांगे यांच्या नेतृत्वाखाली मराठा आरक्षण आंदोलन करण्यात येत आहे.

या आंदोलनात सहभागी होण्यासाठी पंढरपूर व माढा तालुक्यातील हजारो मराठे आ. अभिजित पाटील, माजी उपनगराध्यक्ष नागेश भोसले यांच्या

उपस्थित हजारो वाहनांद्वारे गुरुवारी सकाळी मुंबईकडे मार्गस्थ झाले.पंढरपूर येथील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे सकल मराठा समाज एकत्रित येत एक मराठा लाख मराठा, अशा घोषणा देत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अश्वारुढ पुतळयास अभिवादन करण्यात आले. आ. अभिजित पाटील म्हणाले की, मराठा समाजाला आरक्षण मिळावे म्हणून मनोज जरांगे हे आंदोलन करत आहेत. या आंदोलनात पंढरपूर व माढा मतदारसंघातील तसेच सोलापूर जिल्ह्यातील मराठा समाजातील युवक सहभागी होत आहेत.

या युवकांना सोबत घेऊन आपण मुंबईला रवाना होत आहे. मी आमदार झाल्यानंतर पहिल्याच अधिवेशनात मराठा समाजाला आरक्षण देण्याची मनोज जरांगे यांनी केलेल्या मागणीची सरकारला आठवण करुन दिली. तसेच ऐन सणासुदीचे दिवस पाहता सरकारने

विशेष अधिवेशन बोलावून मराठा समाजाचा आरक्षणाचा प्रश्न मार्गी लावून मराठा समाजाला न्याय द्यावा, अशी मागणी आ. पाटील यांनी केली.

# मानाचा ईच्छा भगवंताची गणेशोत्सवाची मंडळाची श्रींची प्राणप्रतिष्ठापना मोठ्या भक्ती भावात संपन्न



सोलापूर (कटूसत्य वृत्त):- सोलापुरातील मानाचा ईच्छा भगवंताची गणेशोत्सव मंडळाच्या लाडक्या गणरायांची प्राणप्रतिष्ठापना मोठ्या भक्ती भावात संपन्न झाली डीजे डॉल्बीला फाटा देत पारंपारिक वाद्यांना मिरवणुकीमध्ये मंडळांनी प्राधान्य दिला दरम्यान रामवाडी परिसरातील सोलापूर महानगरपालिका आरोग्य केंद्र समोर ईच्छा भगवंताची परिवाराचे आधारस्तंभ लक्ष्मण मामा जाधव यांच्या मार्गदर्शनाने ईच्छा भगवंताची परिवाराचे मार्गदर्शक अनिल जाधव, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेश उपाध्यक्ष किसन भाऊ जाधव कार्यसम्राट नगरसेवक नागेश अण्णा गायकवाड मंडळा चे अध्यक्ष मोहित गायकवाड प्रदेश युवक सरचिटणीस चेतन नागेश अण्णा गायकवाड यांच्या हस्ते ईच्छा भगवंताची गणेशाची पूजा करण्यात आले याप्रसंगी मंडळा चे आदित्य जाधव, प्रेम नागेश गायकवाड, उत्कर्ष गायकवाड, कार्तिक जाधव, अजिंक्य जाधव, करण जाधव, तुशार गायकवाड,आदित्य जाधव आनंदकर, माऊली जरग,माणिक कांबळे,वसंत कांबळे,दर्शन दुबे, तेजस गायकवाड, तन्मेश गायकवाड, अनिकेत चंदू(ब्रदर)जाधव, आदर्श चंदू (ब्रदर)जाधव, बसु शेवगार, दर्शन बिराजदार, प्रथमेश पवार, अथर्व गायकवाड ऋषी येवले, सोनू पटेल,सौरभ पाताळे, श्रीनिवास गायकवाड, नागराज गायकवाड, साद मुलाणी, महादेव राठोड, आनंद गाडेकर, यांच्यासह ईच्छा भगवंताची परिवाराचे गणेश भक्त मोठ्या संख्येने मिरवणुकीमध्ये सहभागी झाले होते. दरम्यान रामवाडी सो.म.पा दवाखाना येथून मिरवणुकीस प्रारंभ करून पटवर्धन चाळ साईबाबा चौक लिमयेवाडी आदिशक्ती माता चौक सेटलमेंट मार्ग मास्तर मैदान ऐक्य चौक भोपळे चौक इच्छा भगवंताची चौक या मार्गावरून येथे मोठ्या दिमाखात ढोल,ताशा, हलग्या आणि अन्य पारंपारिक वाद्याच्या गजरात हे मिरवणूक मार्गस्थ झाले आणि इच्छा भगवंताची चौक येथे या श्रींचे प्राणप्रतिष्ठापना मिरवणुकीचे विसर्जन करण्यात आले.

गणेशोत्सवाच्या ११ दिवसाच्या काळामध्ये विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात येणार आहेत गरजू व गरजवंतांना शालेय उपयोगी साहित्य वाटप, रक्तदान शिबिर, महिलांसाठी खास विविध स्पर्धा अशा कार्यक्रमांचा समावेश असणार असल्याचे यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेश उपाध्यक्ष किसन जाधव यांनी सांगितले.

ईच्छा भगवंताची मंडळाचे गेल्या अनेक वर्षापासून मंडळाचे आधारस्तंभ लक्ष्मण मामा जाधव यांच्या मार्गदर्शनाने अत्यंत शिस्तबद्ध मिरवणूक काढण्यात येते यंदाच्या वर्षी डॉल्बी डीजे ला फाटा देत पारंपारिक वाद्यांना आम्ही प्राधान्य दिले गणेशोत्सवात गणपती बाप्पाची मूर्ती स्थापन करण्याला खूप महत्त्व आहे मोठ्या भक्ती भावात मंडळाच्या श्रींची प्राणप्रतिष्ठापना करण्यात आली असल्याचेही यावेळी किसन जाधव म्हणाले.

सालाबाद प्रमाणे यंदा देखील शेकडो संख्येने इच्छा भगवंताची परिवाराचे गणेश भक्त मिरवणुकीमध्ये सहभागी झाले होते विशेषतः डॉल्बीमुक्त मिरवणूक ही संकल्पना यंदाच्या वर्षी मंडळांनी केले आहे असेही यावेळी मंडळाचे मार्गदर्शक अनिल दादा जाधव म्हणाले.

मोठ्या भक्तिमय व मंगलमय वातावरणात धार्मिक विधिवत पूजन होऊन इच्छा भगवंताची गणेशोत्सव मंडळांच्या श्रींची प्राणप्रतिष्ठापना करण्यात आली.

# यंदाचा युवा महोत्सव सांगोला महाविद्यालयात रंगणार

सोलापूर (कटूसत्य वृत्त):- पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचा २१ वा उन्मेष सृजनरंगाचा युवा महोत्सव सांगोला येथील सांगोला महाविद्यालय येथे दि. ७ ते १० ऑक्टोबर या कालावधीत रंगणार असल्याची माहिती कुलगुरू प्रा. प्रकाश महानवर यांनी दिली. नृत्य, नाट्य, लोककला, ललित, वाङ्मय, संगीतविभागातील एकूण ३९ कला प्रकारांचे सादरीकरण या युवा महोत्सवात होणार आहे. विद्यापीठाच्या संलग्नित महाविद्यालयातील जवळपास २००० विद्यार्थी कलाकारांचा यामध्ये सहभाग असणार आहे. या युवा महोत्सवात लावणी, समूह गायन (भारतीय), कातरकाम, मूक अभिनय, प्रश्नमंजुषा (लेखी), वक्तृत्व मराठी, भारुड, काव्यवाचन, भित्तीचित्रण,

मेहंदी, भजन, एकांकिका, शास्त्रीय नृत्य, सुगम गायन, वक्तृत्व इंग्रजी, पथनाट्य, स्थळचित्रण, लोक वाद्यवृंद, जलसा, स्थळ छायाचित्रण, पोवाडा, शास्त्रीय सूरवाद्य, कथाकथन, मिमिक्री, व्यंगचित्र, कव्वाली प्रश्नमंजुषा (तोंडी), निर्मिती चित्र, शास्त्रीय गायन, पाश्चात्य समूहगायन, वक्तृत्व हिंदी, पाश्चिमात्य वादन, रांगोळी, शास्त्रीय तालवाद्य, मातीकाम आणि लोकनृत्याच्या स्पर्धा होणार आहेत. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचा युवा महोत्सव आयोजनासाठी विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागाकडून प्रस्ताव मागवण्यात आले होते. त्यानुसार यंदाचा हा २१ वा युवा महोत्सव सांगोला महाविद्यालयात होणार आहे. चार दिवस चालणाऱ्या युवा महोत्सवात विद्यार्थ्यांचा उत्साह आणि आनंदाला उधाण येत असते. मागील अनेक वर्षापासून हा युवा महोत्सव अधिकाधिक दर्जेदार होत असून यामुळे चांगले कलाकार घडत आहेत. विद्यार्थी विकास विभागाकडून याचे सूक्ष्म नियोजन केले जाते. या युवा महोत्सवात विद्यापीठाच्या संलग्नित महाविद्यालयातील जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभागी व्हावे, असे आवाहन विद्यापीठ विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. केदारनाथ काळवणे यांनी केले आहे.

**सोलापूर विद्यापीठाकडून यजमानपदाची घोषणा**
**७ ते १० ऑक्टोबर दरम्यान युवा महोत्सव होणार**

# गणेशोत्सव व ईद-ए-मिलादनिमित्त पोलिसांचा रूट मार्च



नातेपुते (कटूसत्य वृत्त):- गणेशोत्सव व ईद-ए-मिलाद या सणांच्या निमित्ताने नातेपुते पोलिस ठाण्यातर्फे शहरातील चौकातून, गल्लीतून पोलीस अधिकारी पोलीस कर्मचारी तसेच गृहरक्षक दलाचे जवान यांचा रूट मार्च काढण्यात आला. या रूट मार्चचा उद्देश कायदा व सुव्यवस्था राखणे, शांतता व सुरक्षेतेची खात्री देणे नागरिकांमध्ये विश्वास निर्माण करणे, हा होता. दरम्यान, पोलिसांनी प्रमुख बाजारपेठ, संमिश्र वस्ती, तसेच एस.टी. बसस्थानक परिसरात शक्तिप्रदर्शन केले. एस.टी. बसस्थानक येथे दंगा नियंत्रणाबाबत प्रात्यक्षिक घेण्यात आले. यात लाठीचार्ज, ढाल व रायफल वापर, गॅस गन आदींचा सराव करून दाखविण्यात आला. तसेच नातेपुते पोलिस ठाणे हद्दीतील फोंडशिरस गावातही दंगाकाबू सराव घेण्यात आला. संपूर्ण सरावात नातेपुते पोलिस ठाण्याचे प्रभारी अधिकारी महारुद्र परजणे, पोलिस उपनिरीक्षक धनाजी ओमासे, ३० पोलिस अंमलदार, एक आरसीपी पथक व २५ होमगार्ड सहभागी झाले होते. सणांच्या काळात शहरात शांतता व जातीय सलोखा टिकविण्याचे आवाहन पोलिसांकडून करण्यात आले.

**नातेपुते शहरात गणेशोत्सव व ईद निमित्त पोलीस अधिकारी व कर्मचारी घेऊन रूट मार्च काढण्यात आला. लोकांना शांतता आणि सुरक्षितेचे खात्री देऊन कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी पोलीस दल सज्ज असल्याचे दाखवून देणे हा रूटमार्चचा उद्देश होता. गणेशोत्सवानिमित्त कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी यासाठी पोलीस दलाकडून अनेक वेळा ठीक ठिकाणी प्रबोधन केले जाते. सध्या गणेशोत्सव मोठ्या जल्लोषात चालू असल्याने नातेपुते शहरात ३० पोलीस कर्मचारी २५ गृह रक्षक दलाचे जवान व ३ पोलीस अधिकारी यांची बंदोबस्तासाठी नेमणूक केली आहे. एसटी बस स्थानक तसेच दहिगाव चौक या ठिकाणी नाकाबंदी करण्यात आली आहे. तसेच पोलीस कर्मचारी व अधिकारी वेळोवेळी गणेश मंडळांना भेटी देत आहेत त्यांना कायद्याचे पालन करण्यासाठी आवाहन करत आहेत.**
**-महारुद्र परजणे (सपोनी नातेपुते पोलीस ठाणे)**

# बार्शी बाजार प्रारूप मतदार यादीवर हरकतींचा पाऊस



बार्शी (कटूसत्य वृत्त):- बार्शी कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक मंडळाच्या पंचवार्षिक निवडणुकीसाठी प्रारूप मतदार यादी निवडणूक प्राधिकरणाच्या आदेशानुसार जिल्हा उपनिबंधक तथानिवडणूकनिर्णय अधिकारी किरण गायकवाड यांनी प्रसिद्ध केली आहे. या यादीवर २८ ऑगस्टपर्यंत हरकती मागवण्यात आल्या होत्या. यामध्ये गुरुवारी सायंकाळी ६ वाजेपर्यंत जवळपास ७५ हरकती दाखल झाल्या आहेत. लवकरच या हरकतींची सुनावणी घेऊन ही प्रकरणे निकाली काढण्यात येणार.

# बार्शीतील जरांगे समर्थक धडकले मुंबईत



मुंबई (कटूसत्य वृत्त):- मराठा समाजाच्या मागण्या साठी मन जरांगे पाटील यांनी पुकारलेल्या आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी बार्शीतील सकल मराठा समाज मोठ्या संख्येने मुंबईमध्ये दाखल झाला.

यावेळे ॲड गणेश हांडे, शुभम चव्हाण, विकी हांडे, विकी शिंदे, निलेश शिंदे, रोहित पाटील, विश्वजीत पवार, राहुल बारुंगळे, महादजी देशमुख, विजय चव्हाण, अजय चव्हाण, अभी बारुंगळे, समर्थ तुपे, संजय चौधरी, आदित्य भोळे, प्रतीक पाटील व बरेच मराठा सेवक उपस्थित होते.

भर पावसातही आंदोलन चालूच राहिले एकही मराठा सेवक मागे हटला नाही. आंदोलन चालू असताना विविध राजकीय नेत्यांनी भेटी दिल्या खासदार ओमराजे निंबाळकर, बजरंग सोनवणे, बंडू जाधव,आमदार प्रकाश सोळंके,संदीप क्षिरसागर, विजयसिंह पंडीत,अभिजित पाटील,आमदार खासदार यांनी भेटी दिल्या व आंदोलनाला पाठिंबा दिला. यावेळी विविध सामाजिक संघटनांचे पदाधिकारी तसेच कार्यकर्ते यांनीही पाठिंबा दिला. मुंबई मध्ये महाराष्ट्रातून मराठा समाज धडकल्यावर वाहनांच्या ५० किलोमीटर रांगा दोन्ही बाजूने लागल्या होत्या.

मुंबईत मराठा समाज दाखल झाल्यानंतर मुंबईमधील सर्व शासकीय यंत्रणा विस्कळीत पडली व इतिहासात पहिल्यांदा मुंबई बंद झाली.

मुंबई मधील प्रत्येक रस्त्यावर फक्त मराठा बांधव दिसत होते आंदोलक रोजच्या मुंबई करांना त्रास होणार नाही याची काळजी घेत होते.

यावेळी आंदोलक घोषणा देत होते. आरक्षण आमच्या हक्काचे, ओबीसी मधून आरक्षण मिळालेच पाहिजे, जरांगे पाटील तुम आगे बढो हम तुम्हारे साथ है, एक मराठा कोटी मराठा, जय भवानी जय शिवाजी च्या घोषणा आंदोलक देत होते.

आता ओबीसी मधून आरक्षण मिळाल्याशिवाय माघारी जायचे नाही असा निर्धार सर्व आंदोलकांनी केला.


**जाहीर प्रसिध्दीकरण** दि.कि.अर्ज क्र: ५४/२०२५ नि.६

**माढा येथील मे.सिव्हील जज्ञ ज्युनिअर डिव्हीजन साो यांचे कोर्टात.**

(१) श्री. मालोजी तानाजी देशमुख इतर }अर्जदार

**विरुद्ध**

कोणी नाही }सामनेवाला

ज्याअर्थी मयत श्रीमती प्रभावती तानाजी देशमुख रा. टेणी हे दिनांक १३/०६/२०२१ रोजी मौजे टेंभुर्णी येथे मयत झाले आहेत. त्यामुळे यातील अर्जदार यांनी ७ व्या वेतन आयोगाचा एकूण राहिलेली रक्कम अर्जदार नं. २ संपत तानाजी देशमुखा मिळावे म्हणून ते मयत प्रभावती तानाजी देशमुख यांचे वारस असलेबाबत चा दाखला मिळणेसाठी प्रस्तुत अर्ज या मे. कोर्टात दाखल केलेला आहे.

त्याअर्थी सदरहू अर्जदार हे मयत श्रीमती प्रभावती तानाजी देशमुख यांचे वारसदार असून त्यातील ७ व्या वेतन आयोगाचा एकूण राहिलेली रक्कम अर्जदार नं. २ संपत तानाजी देशमुख यांना मिळावी याबाबत असे कोणास म्हणावयाचे व समजावयाचे असेल तर काही तक्रार असेल तर त्यांनी हे जाहीर प्रसिध्दीकरण प्रसिध्द झालेपासून एक महिन्याचे आत अथवा नेमलेली दिनांक ८ /१०/२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता त्यांनी स्वतःनी अगर माहितगार वकिलामार्फत हजर राहून आपल्या लेखी हरकती कळवाव्यात. सदर मुदतीत कोणाचीही योग्य हरकत न आलेस अर्जदार यांचे हक्काबाबत लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क शाबीत झाल्यास त्यांना मयत श्रीमती प्रभावती तानाजी देशमुख यांचे वारस म्हणून यांच्या ७ व्या वेतन आयोगाची एकूण राहिलेली रक्कम अर्जदार नं. २ संपत तानाजी देशमुख यांना मिळावी सदर मुदतीत कोणाची हरकत न आलेस मे. कोर्ट अर्जदाराचे अर्जास अनुसरुन त्याचे मागणी प्रमाणे अर्जदारांना वारस दाखल देतील मग नंतर कोणाचीही तक्रार चालणार नाही. सदरचे जाहीर प्रसिध्दीकरण आज दिनांक ३०/०८/२०२५ रोजी न्यायालयाच्या शिक्यानिशी व सहीनिशी दिले.

हुकूमावरुन
सहा अधिक्षक
लिपीक (शिक्का) दिवाणी न्यायालय क.स्तर,माढा



**जाहीर प्रसिध्दीकरण** दि.कि.अर्ज क्र: ६९०/२०२५ नि.६

**सोलापूर येथील मे. सिव्हील जज्ञ सिनिअर डिव्हीजन श्री.एस.एस.शिंदे सो..यांचे कोर्टात**

१) श्रीमती आशा एकनाथ थोरबोले,
वय - ४० वर्षे, धंदा- घरकाम,
२) अमृता एकनाथ थोरबोले,
वय-२१ वर्षे,धंदा- शिक्षण,
३) अर्पिता एकनाथ थोरबोले,वय:१९ वर्षे,
धंदा : शिक्षण, वरील सर्व रा.८९ ई, १०४,
श्रीशल्य नगर, भवानी पेठ, सोलापूर.
४) श्रीमती सुशिला मारुती थोरबोले,
वय : ७५ वर्षे, धंदा : घरकाम
रा. रेड्डे, ता.मंगळवेढा, जि.सोलापूर. }अर्जदार

**विरुध्द**

कोणी नाही }सामनेवाला

ज्याअर्थी यातील अर्जदार नं. १ यांचे पती व अर्जदार नं. २ व ३ यांचे वडिल तसेच अर्जदार नं.४ यांचा मुलगा एकनाथ मारुती थोरबोले हे सोलापूर येथील कायमचे रहिवाशी होते व त्यांना मयताच्या मृत्युपश्चात मिळणारी रक्कम ही महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ यांच्याकडे जमा आहे. त्यानंतर दि. ३०/१२/२०२४ रोजी अर्जदार नं.१ यांचे पती व अर्जदार नं.२ व ३ यांचे वडिल तसेच अर्जदार नं.४ यांचा मुलगा एकनाथ मारुती थोरबोले यांचे निधन झाले. कै. एकनाथ मारुती थोरबोले यांचे मृत्युपश्चात महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन, सोलापूर यांचे कार्यालयामध्ये जमा असलेली एकूण रक्कम रुपये २५,९६,७८१/- इतकी रक्कम ही अर्जदार नं. १ ते ४ यांना मिळणेकरीता वारस या नात्याने सदरचा अर्ज मे.कोर्टात दाखल केलेला आहे.

त्याअर्थी कोणाची वर नमूद अर्जदारांना वारसप्रमाणपत्र मिळण्यास हरकत असल्यास हे प्रसिध्दीकरण प्रसिध्द झाले तारखेपासून ३० दिवसाच्या आत किंवा नेमलेली तारीख १३/१०/२०२५ रोजी मे. कोर्टात हजर होऊन आपले म्हणणे सादर करावे, मुदतीत कोणाची हरकत न आलेस पुढील योग्य ती कारवाई करणेत येईल याची नोंद घ्यावी. हे जाहीर प्रसिध्दीकरण दिले ता.२९/०८/ २०२५

हुकूमावरुन
सहा अधिक्षक
लिपीक (शिक्का) दि.न्यायालय व.स्तर,सोलापूर.



**जाहीर प्रसिध्दीकरण** दि.कि.अर्ज क्र: ७३५/२०२५ नि.६

**सोलापूर येथील मे. दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर मा.रेडकर सो यांचे कोर्टात**

१) श्री. गिरीश एकनाथ बोरगांवकर
वय : ५५ वर्षे, धंदा:- नौकरी,
रा. बी-१२३, सिंधू विहार, जुळे सोलापूर
२) श्री. शिरीष एकनाथ बोरगांवकर
वय : ७१ वर्षे, धंदा :- नोकरी,
रा. घर नं. ५५/बी, समर्थ निवास,
कोणार्क विहार, फराडे नगर, नांदेड
३) सौ. अश्विनी अभय बेलसरे
वय : ६० वर्षे, धंदा:- गृहिणी,
रा. प्लॉट नं. ४६, लक्ष्मी निवास, संकट मोचन
हनुमान मंदिर, जवाहर कॉलनी जवळ,
छत्रपती संभाजी नगर (औरंगाबाद) }अर्जदार

**विरुध्द**

कोणीही नाही }सामनेवाला

ज्याअर्थी अर्जदारानी कै. एकनाथ गणेश बोरगावकर यांचे निधन दि.२९/०३/२०२१ रोजी निधन झाले असून त्यांच्या नावे जिल्हा व उपजिल्हा सोलापूर पैकी तालुका उत्तर सोलापूर पैकी मोजे मजरेवाडी तसेच सिंधु विहार या नावाने ओळखल्या जाणाऱ्या नगरामधील निळकत सर्व्हे नं. १२५/२३ आणि १२५/२४ पैकी त्यांसी प्लॉट नं. १२३ त्याचे क्षेत्र ९०.७३ चौ. मी. आणि त्यामधील असलेल्या तदंगभूत चीजवस्तू सह असलेली मिळकत त्यांच्या पश्चात त्यांचे वारसदार म्हणून ती मिळकत अर्जदारांच्या नावे असल्याचे ठरवून मिळण्यासाठी प्रस्तुतचा वारसप्रमाणपत्र मिळणेसाठी अर्जदारांनी या मे. कोर्टाकडे अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जाबाबत कोणाचेही काहीही म्हणणे अगर हरकत असल्यास त्यानी सदरची नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसात अथवा नेमलेल्या तारीख ०१/१०/२०२५ रोजी प्रत्यक्ष स्वतः अथवा विधिज्ञामार्फत हजर राहून म्हणणे, हरकत सादर करावेत, मुदतीत कोणाचीही हरक्त न आल्यास इकडील कोर्ट पुढील ने योग्य ते आदेश पारित करतील. हे जाहीर प्रसिध्दीकरण केले. ता. २९/०८/२०२५

हुकूमावरुन
सहा अधिक्षक
लिपीक (शिक्का) दि.न्यायालय व.स्तर,सोलापूर.



**जाहिर प्रगटन** संचिका क्र.२०२३/आरओआर/ऐ-३५२

**संतोष राऊत, उपजिल्हाधिकारी भुसंपादन मध्यम प्रकल्प क्रमांक ०२, धाराशिव यांचे न्यायालयात**

(उपविभागीय अधिकारी धाराशिव यांचेकडून वग झालेली प्रकरणे)

०१. रहिमतबी सुलेमान पठाण राहणार वडगाव खुर्द हल्ली मुक्काम मंगळूर तालुका तुळजापूर जि. धाराशिव } वादी

**विरुध्द**

१.युनुस बासुलाला पठाण रा.येवती तालुका तुळजापूर
२.हसन बासुलाल पठाण रा. येवती तालुका तुळजापूर
३.नशामी हारुण मुजावर रा.इटकळ तालुका तुळजापूर
४.आजमत सवाल पठाण रा.पिंपरी तालुका बार्शी जिल्हा सोलापूर
५.रुकसाना तकदीर शेख रा.येवती तालुका तुळजापूर जिल्हा धाराशिव } प्रतिवादी

या जाहीर प्रगटनाव्दारे आपणास कळविण्यात येते कि, मौ. येवती येथील वादी नामे रहिमतबी सुलेमान पठाण रा. वडगाव खुर्द हल्ली मुक्काम मंगळूर ता. तुळजापूर जि. धाराशिव यांनी (उप विभागीय अधिकारी धाराशिव यांचे कडून वर्ग झालेल्या) या न्यायालयात रहिमतबी विरुध्द युन्नुस (फेर क्रं २०९० / २०१७) गट नंबर ९५ / २ क्षेत्र ०१ है.६२ आर बाबत फेरफार क्रमांक २०९० संदर्भात प्रस्तुतचे अपील दाखल केले असुन ते न्यायप्रविष्ट आहे. प्रकरणात दिनांक १९/०६/२०२५, ०२/०७/२०२५, १८/०७/२०२५, २०/०८/२०२५ रोजी सुनावणी घेण्यात आली सदरील सुनावणीस प्रतिवादी हे सतत गैरहजर राहिल्याचे निर्दशनास आले. प्रतिवादी यांना वारंवार नोटीस तामील होत नसल्याने वादी यांचे विधिज्ञ यांचे विनंतीवरुन उक्त प्रतिवादी यांचेसाठी प्रस्तुत जाहीर प्रगटनाव्दारे नोटीस देण्यात येते कि, प्रकरणात सुनावणी करीता दिनांक १८/०९/२०२५ ही तारीख नेमण्यात आली आहे. प्रतिवादी हे जाणून बुजून नोटीसा घेत नाहीत अथवा टाळाटाळ करत असल्यामुळे सदर प्रकरणात प्रतिवादी व त्यांचे हितसंबंधित व्यक्ती यांना या जाहीर नोटीस द्वारे कळवण्यात येते की, तुम्ही दिनांक १८/०९/२०२५ रोजी दुपारी ०३:०० वाजता तहसील कार्यालय तुळजापूर येथे सुनावणीसाठी हजर राहावे व आपले म्हणणे स्वतः अथवा विधीज्ञा मार्फत न्यायालयात सादर करावे अन्यथा तुमच्या गैर हजेरी मध्ये अपीलाची एकतर्फी सुनावणी होऊन निर्णय पारीत केला जाईल याची नोंद घ्यावी सदरची नोटीस आज दिनांक: २९/०८/२०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्कानिशी दिले.

(संतोष राऊत)
उपजिल्हाधिकारी (भूसंपादन)
मध्यम प्रकल्प क्रमांक ०२
धाराशिव

ठिकाण:धाराशिव
दि:२९/०८/२०२५ (शिक्का)